**संक्षिप्त फौ.प्र.क्र.०९/२०२५**

**निशाणी क्र.६ लगत**

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०२</u>**

माझे नाव - अशोक शिवलिंग भूईंजकर,

वय - ५४ वर्षे, व्यवसाय – शेती,

राहणार - धामणी, ता. माण, जि. सातारा,

**<u>सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री. वाय. डी. इंगवले यांच्याव्दारे,</u>**

दिनांक ०५/११/२०२४ रोजी दहिवडी पोलीसांनी मला बोलावल्याचे मला आठवत नाही. माझ्यासमोर पोलिसांनी कोणताही पंचनामा केला नव्हता. पोलिसांनी माझी पंचनाम्यावर सही घेतली होती. आता मला पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहिती नाही. पंचनाम्यावर अनुक्रमांक ०२ वर माझी सही आहे. सहीला **निशाणी १०** देण्यात येते.

**<u>साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करीत नसल्याने उलटतपास सहा.सरकारी अभियोक्ता यांचे मार्फत,</u>**

हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ०५/११/२०२४ रोजी दहिवडी पोलीसांनी मला जयमल्हार हॉटेलच्या आडोशाला पंचनामा करण्यासाठी बोलवले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर घटनास्थळी पोलीस स्टाफ व आम्ही दोन पंच पायी चालत गेलो व सकाळी ११.०० वाजण्याच्या सुमारास छापा टाकला. हे म्हणणे खरे नाही की, तेथे एक इसम सुरज महादेव खरात देशी दारूची बेकायदा विक्री करत होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीकडे असलेल्या पांढ-या रंगाचे पिशवीत देशी दारू सखु संत्रा टँगो प्रिमियम असे लेबल असलेल्या ९० मि.ली.च्या १७ सिलबंद प्लॅस्टिक बाटल्या प्रत्येकी रू.३५/- किंमतीच्या मिळून आल्या. हे म्हणणे खरे नाही की, जप्त मुद्देमालातील एक बाटली रासायनिक विश्लेषणासाठी काढून पंचासमक्ष सिलबंद केली. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझे समक्ष पंचनामा तयार केला व मी त्यावर वाचून सही केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझे ओळखीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाचवण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे. उलटतपास पूर्ण.

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री. व्ही. बी. हिरवे यांनी नाकारला,**

श्रवणोत्तर स्वीकृत,

माझे समक्ष,

सही/-

(ए.वाय. शेख)

दि. २४/०७/२०२५

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दहिवडी.